# ।। गुरू महिमा को अंग ।।
# मारवाडी + मराठी
# सत्संग


महत्वाची सुचना:- रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.


* वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

## ।। गुरू महिमा ।।

।। कवित ।।

नमो नमो गुरूदेव ।। प्रम निज भेव बताया ।।
निर्गुण ग्यान बिचार ।। हंस परम हंस कुबाया ।।
नमो नमो गुरूदेव ।। समंद मे डूबत तार्‍यां ।।
नमो नमो गुरूदेव ।। बांहा गहे पार उतार्‍या ।।
नमो नमो गुरूदेव ।। ग्यान मोहे निर्भे दीया ।।
नमो नमो गुरूदेव ।। तिमर मन का हर लीया ।।
जन सुखिया गुरूदेवजी ।। सिष के तारण हार ।।
भवसागर मे तारज्यो ।। लीज्यो बाहे पसार ।।१।।




गुरुदेवांनी भवासागराच्या पलीकडील परमसुखाच्या देशात म्हणजे निजदेशात पोहचण्याचा भेद सांगितला म्हणुन गुरुदेवास नमस्कार आहे, नमस्कार आहे.निर्गुण ज्ञान म्हणजे निर्गुण पित्याच्या पलीकडचे सतगुरु विज्ञान ज्ञान पदात पोहचण्याचा भेद सांगितला ज्याच्याने मी हंसाचा परमहंस बनलो म्हणजे मायेत न येणारा वैरागी विज्ञान ज्ञानी बनलो म्हणुन गुरुदेवास नमस्कार आहे,नमस्कार आहे.जसे– कोणी मनुष्य महासमुद्रात बुडत आहे आणि कोणी जानकार मनुष्य त्याचा बाहु धरुन बुडण्यापासुन वाचवतो आणि त्या भयंकर महासमुद्राच्या पार उतरवितो.अशाच प्रकारे माझ्या गुरुदेवांनी मला काम,क्रोध,लोभ,मोह,मत्सर व शब्द, स्पर्श,रुप,रस,गंध या विकारी वासनांच्या भवसागरात बुडण्यापासुन वाचविले आणि अशा भवसागरात बुडु न देता त्याचा बाहु धरुन म्हणजे केवल ज्ञानाच्या समजमध्ये ठेवून पार केले म्हणुन गुरुदेवास नमस्कार आहे, नमस्कार आहे.मला गुरुदेवांनी जिथे काळ नाही अशा निर्भय देशात पोहचण्याचे ज्ञान दिले म्हणून गुरुदेवास नमस्कार आहे, नमस्कार आहे.गुरुदेवांनी त्रिगुणी मायेच्या भक्तीत राहशील तर मायेचे पाच विषयाचे सुख मिळतील आणि ही भक्ती त्यागेल तर मी या मायेच्या सुखांपासुन वंचित राहील म्हणजे सुखरहीत असा दु:खी राहील आणि दु:खातच पडून राहिल हे अज्ञान अंधार मायेच्या सुखाच्या पलीकडचे अद्‌भुत सुखांचे ज्ञान देवुन मिटवले आणि ज्ञानाने समजविले की त्रिगुणी मायेतच काळ आहे म्हणजे त्रिगुणी मायेचे सुखच महादु:खाचे मूळ आहे आणि त्रिगुणी मायेच्या सुखांच्या पलीकडचे विज्ञान वैराग्य पदाचे सुख हेच महासुखाचे भंडार आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व जगाच्या ज्ञानी ध्यानी तसेच स्त्री,पुरुषांना समजवितात की गुरुदेव सर्व शिष्यांना बाहू पसरवून भवसागरातून

तारणारे आहे म्हणून गुरुदेवांना नमस्कार आहे,नमस्कार आहे.।।१।।

गुरूदेवन के देव ।। सेव कीज्यो सब कोई ।।
गुरू जीवां की जहाज ।। गुरां बिन मुक्त न होई ।।
ब्रम्हा विष्णु महेस ।। गुरां कूं सीस निवावे ।।
राम किसन अवतार ।। गुरां सु मोख सिधावे ।।
सुखराम दास गुरूदेव का ।। क्हां लग करूं बखाण ।।
अथंग अथाहा अपार हे ।। गुरू दर्याव समान ।।२।।

गुरुदेव हे निर्गुण होणकाळ ईशवराचे तसेच सर्व त्रिगुणी मायेच्या देवतांचे म्हणजे ब्रम्हा, विष्णु,महादेव,शक्ती व अवतार इ.देवतांचे देव आहेत म्हणुन सर्वांनी गुरुदेवाची सेवा म्हणजे भक्ती केली पाहीजे.जसे जीवांना महासागरातुन पार होण्यासाठी जहाज असते तसेच भवसागरातुन मुक्त म्हणजे पार होण्यासाठी गुरु हे जहाज आहेत म्हणुन ब्रम्हा,विष्णु,महादेव जे ३ लोक १४ भवनाचे सर्व छोटे मोठे देवता आहेत ते ही भवतारी गुरुला मस्तक नमवितात.रामचंद्र आणि कृष्ण हे जगाचे सर्वात मोठे पराक्रमी करामाती अवतार होते.रामचंद्राने रावणाचा आणि कृष्णाने कंसाचा संहार केला आणि जगाला या भयंकर राक्षसाच्या अत्याचारापासुन मुक्त केले अशा अवतारी रामचंद्राने वशिष्ठ मुनीला गुरु केले आणि कृष्णाने दुर्वासा मुनीला धारण केले आणि असे दोघे करामाती अवतार गुरुच्या सत्तेने मोक्षाला गेले म्हणुन आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व स्त्री,पुरुषांना तसेच ज्ञानी,ध्यानी यांना सांगतात की गुरुदेवाची कुठपर्यंत महीमा करु?जसे महासमुद्राचा पार किंवा थांग लागत नाही याप्रकारे गुरुदेवाचे भवसागरातून पार करुन देणाऱ्या सत्तेचा पार किंवा थांग लागत नाही. ।।२।।

बिन जळ मिटे न प्यास ।। सीत अंबर बिन सोई ।।
भोजण बिन परसाद ।। भूक जुग जाय न लोई ।।
कंचन कसण सोनार ।। हार तागा बिन राखे ।।
जुग हुन्नर सब काम ।। बात सुणियां बिन भाखे ।।
सील सांच संतोष ।। ग्यान बिन भ्रम न जावे ।।
जन सुखिया बिन सूर ।। तिमर कहो कूण मिटावे ।।३।।

कड्क उन्हाळा आहे आणि जीव तहानलेला आहे.अशा जीवाची तहान पाण्यानेच मिटते पाणी सोडून दुसऱ्या कोणत्याही वस्तुने मिटत नाही.याचप्रकारे जीवाला मोक्ष गुरुदेवा–कडुनच मिळतो.कडाक्याची थंडी आहे आणि जीव थंडीने व्याकुळ आहे अशा अति कडाक्याच्या थंडीत जीवाची थंडी गरम कपडे पांघरल्यानेच जाते आणखी दुसऱ्या कोणत्या वस्तुने जात नाही अशा प्रकारे जीवाला मोक्ष गुरुदेवाकडूनच मिळतो.खूप भूक

लागली आहे ती भूक भोजन केल्यानेच मिटते दुसऱ्या कोणत्याही वस्तुने मिटत नाही अशाच प्रकारे जीवाला मुक्ती गुरुदेवापासूनच मिळते.सोनार सोन्याचा हार बनविण्यासाठी सोन्याला शुध्द करतो आणि हारास लागणाऱ्या सर्व वस्तु बनवितो परंतु तो हार दोऱ्यामध्ये ओवल्याशिवाय बनत नाही अशाच प्रकारे जीवाला मोक्ष गुरुदेवाशिवाय मिळत नाही.जगाचे सर्व हुन्नर किंवा काम,हुन्नर किंवा कामाची कला ज्ञानाने समजविल्या शिवाय जगात लोक एकमेकांना सांगतात त्याच्याने तो हुन्नर किंवा काम कोणास प्राप्त होत नाही.अशा प्रकारे भवतारी गुरु मिळाल्या शिवाय अन्य संतांची वाणी वाचून वाचून झालेल्या गुरुपासुन कोणाला मोक्ष मिळत नाही.शिष्याने कैवल्य गुरुचा शरणा घेताच शिष्यात सहजमध्ये कैवल्य ज्ञान प्रगट होते आणि त्याचबरोबर कुद्रतीच शिल,सांच, संतोष असे चौसष्ट शुभ लक्षण प्रगट होते आणि जीवाचा त्रिगुणीमायेच्या कर्मकांडात खरे,पूर्ण आणि तृप्त सुख आहे हा भ्रम कुद्रतीच नाहीसा होतो जसे सूर्य उगवल्या–शिवाय रात्रीचा दाट अंधार कोणी मिटवू शकत नाही याचप्रकारे जीवात कैवल्य ज्ञान उदित झाल्याशिवाय मायेच्या कर्मकांडाने प्राप्त होणाऱ्या विषयांच्या सुखातच महासुख आहे हा भ्रम कोणी मिटवू शकत नाही असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व स्त्री,पुरुषांना समजावून राहिले आहेत. ।।३।।

सतगुरू बिना न मोख ।। भूप बिन पटा न देवे ।।
पातस्याहा बिन हुकम ।। जगत की खबर न लेवे ।।
समंद न ऊतऱ्यो जाय ।। नांव कासट बिन सोई ।।
हीरा रतन से माय ।। भेद मरजीवा होई ।।
पारस बिन बोहो पाहाण ।। लोहो कुं आण लगावे ।।
जन सुखिया सतगुरू बिना ।। जीव कोई मोख न जावे ।।४।।

जसे जगात राजाशिवाय जहागिरीचा पट्टा दुसरा कोणीही देवू शकत नाही.अशाच प्रकारे सतगुरु शिवाय कोणतीही देवी–देवता,अवतार किंवा यांचे साधू संत मोक्षाचा पट्टा देवू शकत नाही.बादशहाच्या हुकूमा शिवाय जगाची खबर कोणीही दुसरा मनुष्य घेवू शकत नाही.जसे–(अकबर बादशहाने संसाराची बालविवाह तसेच गुलामीची खबर घेतली आणि संसाराची बालविवाह तसेच गुलामी मिटवली.ही बालविवाह आणि गुलामी बादशहा सोडून त्याच्या राज्याचा कोणीही मोठ्याहून मोठा हुद्देदार करु शकत नाही) याचप्रकारे सतगुरु अन्य कोणतीही देवी देवता किंवा देवी–देवतांचे पद प्राप्त केलेले गुरु मोक्ष देवू शकत नाही.समुद्र दगडाच्या नावेने कधी पार होवू शकत नाही.त्याला पार करण्याकरिता लाकडाची नाव पाहिजे याचप्रकारे मोक्ष प्राप्त करण्याकरिता परमपदाचे सतगुरु पाहिजे.हिरे आणि रत्न समुद्रातच आहे परंतु त्यांना प्राप्त करण्याचा

भेद मरजीवा म्हणजे गोताखोरा–शिवाय कोणाजवळ राहत नाही.याच प्रकारे मोक्ष प्राप्तीची विधी घटातच असते परंतु तिला प्राप्त करण्याचा भेद फक्त सतगुरुच्याजवळ असतो अन्य देवी–देवता आणि अवतारा–जवळ राहत नाही.लोखंडाला पारस दगडच सोने बनवू शकतो अन्य दगड सोने बनवू शकत नाही.याचप्रकारे हंसाला सतगुरुच गर्भात कधीच न येणारा परमहंस बनवू शकतात. अन्य देवी देवता किंवा मायावी गुरु बनवू शकत नाही.याकरिता आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व जगाच्या स्त्री–पुरुषांना सांगतात की सतगुरुच्या शिवाय कोणीही जीव मोक्षात जावू शकत नाही म्हणजे परमहंस बनू शकत नाही. ।।४।।

**गुरू केसो करतार ।। गुरू गत अकथ कहाणी ।।**
**सिव सनकादिक सेंस ।। बिष्न बोले मुख बाणी ।।**
**लख चोरासी जूंण ।। जाय भुगतो तम सोई ।।**
**गुरू निंद्या को पाप ।। तोय ऊतरे नही कोई ।।**
**सिष सतगुरू कू आ कियो ।। गुरा दीनो भेद बताय ।।**
**चोरासी सुखराम क्हे ।। बांतां सटे गमाय ।।५।।**

गुरुच कर्तार आहे.गुरुची गती कथण्यास येत नाही अशी अकथ आहे.शिव, सनकादिक,शेष तसेच विष्णू हे सर्व लोक गुरुची महीमा करतात तसेच गुरुची महीमा जशीच्या तशी मुखाने कथली जात नाही असे समजतात.शिव,सनकादिक,शेष,विष्णू समजतात की गुरु निंदेचे पाप ८४ लक्ष योनीत पडून दु:ख भोगले तरीही उतरत नाही याचा दाखला आहे कि शिष्य नारदाने गुरुची निंदा केली आणि त्याला विष्णूने निंदेचे पाप भोगण्यासाठी ८४ लाख योनीत पडून जुलूम भोगण्याची शिक्षा दिली.ही शिक्षा नारदाने आपल्या गुरु काळू भोईला सांगितली तेव्हा गुरु काळू ने शिष्य नारदाला ८४ लक्ष योनी भोगण्याचा भेद सांगितला आणि नारदाला ८४ लक्ष योनी भोगण्याचा झालेला हूकूम बोलण्या बोलण्यात गुरु ज्ञानाच्या पराक्रमाने मिटवून दिला अशी गुरुची अकथ कहाणी आहे म्हणजे जे पाप भोगल्याने ही मिटू शकत नव्हते ते पाप गुरुने सहजात मिटवून दिले.याचप्रकारे ८४ लक्ष योनीत पडण्याचा आवागमनाचे चक्र कोणाच्याने मिटू शकत नाही ते जीवाचे चक्र गुरुच्या सत्तेने सहजात मिटून जाते.।।५।।

**काळुसा गुरूदेव ।। सिष नारदसा कहीये ।।**
**गुरू बिन मुक्त न होय ।। भेद बिन मोख न लहीये ।।**
**वाष्ट मुनि पें आय ।। राम बूज्यो तत्त सोई ।।**
**जीव मोख किम जाय ।। तांहि गत कहीये मोई ।।**
**जन सुखिया बासट कही ।। रामचंद्र सुण कान ।।**

अळा पिंगळा सुखमणा ।। ब्रम्ह मिलण को ओ ध्यान ।।६।।

चारी वेदात प्रविण असा नारद मुनी शिष्य आणि मासोळ्या पकडणारे गुरु काळू अशा काळूच्या ज्ञानाने नारद ८४ लक्ष योनीच्या दोषापासून मुक्त झाला स्वत:च्या ज्ञानाने मुक्त झाला नाही.याचप्रकारे सतगुरुच्या परमभेदाशिवाय जीव ८४ लक्ष योनीच्या दु:खाच्या चक्रातून मुक्त होत नाही.तीन लोकात पराक्रमी असा विष्णूचा अवतार रामचंद्र विष्णूच्या पलीकडील तत्तज्ञान म्हणजे मोक्षास जाण्याचा रस्ता गुरु वशिष्ठ मुनीला विचारण्यास गेला तेव्हा गुरु वशिष्ठने रामचंद्राला विधी सांगितली आणि सांगितले की गंगा,यमुना,तसेच सुषमनाचा जिथे संगम होतो त्या संगमाच्या रस्त्याने गेल्याने सतस्वरुप ब्रम्हची प्राप्ती होते असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणाले.।।६।।

राम किया गुरूदेव ।। किसन सरणागत आया ।।<br>
गोरख समरथ जाण ।। गुरां बिन नांय कुवाया ।।<br>
तीन देव को अंस ।। दत्त बोले सत्त बाणी ।।<br>
गुरू धारण चोवीस ।। सुख म्हेमा गुरू जाणी ।।<br>
गुरू सम जुग मे को नही ।। देव बिसन अवतार ।।<br>
जन सुखिया गुरूदेव के ।। सरणे रहो बिचार ।।७।।

अवतार रामचंद्राने वशिष्ठ मुनीला गुरु केले तर अवतार कृष्णाने गुरु दुर्वासाचा शरणा घेतला असेच गोरक्षनाथ गुरु मच्छिंद्रनाथाच्या कारणाने समर्थ म्हणजे अमर होण्याचा अधिकारी बनला.याचप्रकारे रामचंद्र,कृष्ण,गोरक्षनाथ हे सर्व गुरु शिवाय समर्थ म्हणजे मोक्षाचे अधिकारी नाही म्हणवले गेले.३ लोक १४ भवनचे मोठे देव ब्रम्हा,विष्णू,महादेव आहे.अशा तीन मोठ्या देवतांचा अंश दत्तात्रयाने ही मोक्ष प्राप्तीसाठी२४ गुरु धारण केले आणि जगालाही मोक्ष प्राप्तीसाठी गुरुच पाहिजे,देवता चालत नाही असे सत्य ज्ञान दिले. सुखदेव बाद्रायणी हा बाल ब्रम्हचारी होता.शरणात आलेल्या जीवांना सरळ विष्णूच्या पदात पोहचविण्याचा अधिकारी होता परंतु विष्णूच्या पलीकडे मोक्षात जाण्यासाठी मोक्षाचा रस्ता जाणणारा गुरु पाहिजे ही गुरुची महीमा जाणली आणि स्वत:चा बाल ब्रम्हचारीचा भेद विसरला आणि गृहस्थी राजा जनकला गुरु केले आणि मोक्षाला पोहचला.याकरीता आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व स्त्री,पुरुषांना समजावून राहिलेत की मोक्ष प्राप्तीकरीता गुरुसारखे जगात ब्रम्हा, विष्णू, महादेव, शक्ती हे देव, रामचंद्र, कृष्ण या सारखे अवतार दत्तात्रया सारखे ब्रम्हा,विष्णू,महादेव यांचा अंश,सुखदेवसारखे जती कोणीही नाही यासाठी सर्वांनी मोक्षाचा भेद देणाऱ्या गुरुचा शरणा घेतला पाहिजे.।।७।।

सुखदेव जती बखाण ।। गुराँ बिन भेद न आयो ।।

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

जनक बदे गुरू दे भेद ।। तत्त सूं तत्त मिलायो ।।
एसा सम्रथ जाण ।। आण हम सरणा लीया ।।
जुगन जुगन की गेल ।। पलक मे पेंड्रा कीया ।।
सतगुरू बीरमदासजी ।। जनक बदे प्रवाण ।।
जन सुखिया अमरिषसा ।। जेदेव दया बखाण ।।८।।

सुखदेव बाद्रायणी हा यती होता.याला सतस्वरुप तत्तात मिळायचे होते पण याला जो पर्यंत गुरु मिळाले नाही.तोपर्यंत सतस्वरुप तत्ताचा भेद मिळाला नाही.जेव्हा याला जनक राजा गुरु मिळाले तेव्हा सतस्वरुप तत्ताचा भेद मिळाला आणि राजा जनक गुरुच्या भेदाने शिष्य जती सुखदेव बाद्रायणी सतस्वरुप तत्तात मिळाला म्हणजे मोक्षात मिळाला.असे गुरु शिष्याला सतस्वरुप तत्तात मिळवून देण्यासाठी समर्थ आहे हे जेव्हा मी गुरु ज्ञानाने जाणले तेव्हा मी गुरु बिरमदासजीचा शरणा घेतला आणि युगानयुगाचा चालून ही पार न होण्यासारखा असा लांब रस्ता गुरुकृपेने बिना कष्टाने पळात पार केला.जनक विदेही गुरुने जती सुखदेवला सतस्वरुप तत्ताशी पळात मिळवून दिले असे संसारात राहूनही जतीचे जती म्हणजे वैराग्य विज्ञानी जनक राजा होते असेच माझे सतगुरु बिरमदासजी महाराज जनक राजासारखे आहेत.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,अधिक माझे गुरु बिरमदासजी दयेत अमरीष राजासारखे आहेत.ज्या दुर्वासाने अमरीषवर अमरीषला मारण्यासाठी कृत्या राक्षसिण प्रगट केली त्याच्यावरच दया करुन सहायता करणारे आहे आणि जयदेवचे ज्या चोराने हाथ आणि पाय तोड्ले होते त्या चोराला राजाच्या दंडापासून मुक्त करवले आणि त्याने चोरी केलेले धन त्यालाच परत मिळवून दिले व राजाकड्रून त्याचा सन्मान करविला असे माझे गुरु बिरमदासजी दयाळू आहेत.।८।

सतगुरू सता समाध ।। जाय ब्रम्हंड घर कीया ।।
प्रमारथ के काज ।। देह जुग बांसा लीया ।।
बड भागी सो जीव ।। सरण सतगुरू की आवे ।।
काग पलट हंस होय ।। कीट सो भ्रंग कहावे ।।
जन सुखिया गुरूदेव की ।। महेमा कही न जाय ।।
आप सरीसा कर लिया ।। सिख कूं च्रण लगाय ।।९।।

माझे सतगुरु बिरमदासजी सतगुरु सत्ताने समाधी देशात पोहचले आहेत.त्यांनी ब्रम्हांड म्हणजे दहाव्याद्वारात घर केले आहे.ते मायावी जगातून निघून गेले आहेत.पूर्ण विज्ञानी वैरागी बनून गेले आहेत तरीही परमार्थासाठी म्हणजे जीवांना काळापासून मुक्त करण्यासाठी जगाच्या लोकांसारखे देहरुपात वस्ती करुन जगात राहतात.कोणी

भाग्यवान जीव असेल तोच सतगुरु बिरमदासजीच्या शरणात येईल किंवा बिरमदासजी सारखे सतगुरुच्या शरणात येईल.त्या जीवाचा कावळ्यास्वरुपी स्वभाव बदलून हंसस्वरुपी स्वभाव बनेल.जसे–कावळा पक्षी हा मोती दिल्यावर मोती खात नाही तो मेलेल्या सडलेल्या प्राण्यांचे मांस खातो पण तसेच हंस पक्षी कधीही मेलेल्या,सडलेल्या प्राण्याचे मांस खात नाही.मोती उपजणाऱ्या सरोवरावर राहून मोती खातो.अशाच प्रकारे जीव विषय विकारांच्या सुखांत लिन राहतो परंतु सतगुरु शरण घेतल्यावर विषय विकाराचे सुख त्यागतो आणि विज्ञान वैराग्याचे महासुख घेतो असा जीव विकारी स्वभाव त्यागून संत स्वभावाचा बनतो.कीट म्हणजे अळी भोवऱ्याच्या शरणात गेल्याने किटचा भृंग म्हणजे भोवरा बनून जातो.कीट हा जमीन किंवा झाडावर पोट भरण्या–साठी दु:ख भोगत जीवन जगणारा प्राणी असतो.असा हा दु:खी कीट भोवऱ्याच्या शरणात आल्याने भोवऱ्यासारखा भोवरा बनून जातो.तो कीटपासून बनलेला भोवरा बनल्यावर चांगल्या चांगल्या फूलांवर चक्राकार फिरतो आणि चांगल्या चांगल्या फुलांचे रस पितो असा सुखी बनून जातो. याचप्रकारे काळ कर्मांच्या दु:खात पडलेला जीव सतगुरुच्या शरणात गेल्याने विज्ञान ज्ञान रस पिणारा महासुखी बनून जातो.म्हणून आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व स्त्री, पुरुषांना सांगतात की,जसा भोवरा शरणात आलेल्या कीटला आपल्यासारखा भोवरा बनवून देतो.

विस्तारीत– अळीचा भवरा होणे.

कीट म्हणजे अळीचा भोवरा कसा बनतो?

वर्षाऋतुच्या साधारणत:–शेवटच्या दिवसात झाडा–झुडूपांवर अळ्या जन्मतात.यात हिरव्या रंगाची अळी राहते.ही हिरव्या रंगाची अळी तीन स्वभावाची असते.याचवेळी भोवरा ही फुलातील रस पिण्यासाठी झाडा–झुडूपांवर रमतो आणि रमण्याच्या वेळेस गुंजार करत असतो.हा गुंजार हिरव्या रंगाच्या अळ्या ऐकतात.त्या हिरव्या अळ्यातील एक हिरवी अळी गुंजार ऐकताच उलटी पडून जाते.दुसरी हिरवी अळी गोल गोल आखुडली जाते आणि तिसरी हिरवी अळी अशी असते की ती भोवऱ्याच्या गुंजार ऐकताच सरळ उभी होवून जाते आणि गुंजार ध्वनीच्या दिशेने खूप हालचाल करायला लागते.त्या अळीला भोवरा तोंडात पकडून आपल्या मातीच्या घरात घेवून जातो आणि त्या अळीला भोवरा आपल्या मातीच्या घरात एकवीस दिवसांपर्यंत भौ भौ चा गुंजार ऐकवतो.ज्याच्याने ती अळी सदासाठी भोवरा बनून जाते आणि जसा भोवरा बाग–बगीच्यात वेगवेगळ्या झाडा–झुडूपांवर जावून फुलांचा सुगंध आणि रस पिण्याचा आनंद घेतो तसेच ही अळी भोवरा बनल्यावर फुलांच्या सुगंधाचा आणि रस पिण्याचा आनंद घेते.ही अळी जमिनीवर रेंगणाऱ्या अन्य अळ्यांपासून सदासाठी वेगळी बनून जाते.

कालपर्यंत पायात चेंगरली जाणारी जी अळी होती ती भोवऱ्याच्या संगतीत येवून फुलांच्या सुगंधाचा आणि रस पिण्याचा आनंद घेते.असेच सतगुरु शरणात आलेल्या शिष्याला आपल्या चरणात घेवून महासुखाच्या परमपदाचा वासी बनवून देतात. याकरीता आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की अशा सतगुरुची महिमा मुखाने कथली जात नाही. ।।९।।

गुरू सिष का दातार ।। मोय अेसा धन दिया ।।
ग्यान ध्यान बमेक ।। बुध दे निर्मळ कीया ।।
वायक वचन बिचार ।। हाल गुरू चाल सिखाई ।।
दीन गरीबी प्रेम ।। भाव सो दया पठाई ।।
अकल अरथ सुनमान ।। सबद बाणी सिर गाजे ।।
जन सुखिया गुरूदेव ।। सिष पर ईसा निवाजे ।।१०।।

गुरु शिष्यासाठी दाता आहेत.त्यांनी मला अद्भूत धन दिले.त्यांनी मला विज्ञान ज्ञान धन दिले.सतस्वरुपाचे ध्यान धन दिले.माया काय आहे?होणकाळ काय आहे? सतस्वरुप काय आहे?हे समजण्याचे विवेक ज्ञान प्रगट करुन दिले.विषय विकाराची कुबुध्दी मिटवून निर्मळ बुध्दी प्रगट करुन दिली.जगाच्या विषय विकाराची तसेच काम,क्रोध,लोभ,मोह,मत्सर,अहंकार स्वभावाचे वाक्यवचन बोलण्याची तसेच विचार करण्याची विधी मिटवून दिली आणि संत स्वभावाचे तोलामोलाचे वाक्य वचन बोलण्याची तसेच विचार करण्याची विधी कुद्रती प्रगट करुन दिली.संत स्वभावाने जगण्याची चाल शिकवली.घटात दीन,गरीबी,प्रेमभाव तसेच दया प्रगट करुन दिली. जीवाच्या प्रती घटात मगरुरी,द्वेषभाव व क्रुरता होती ती मिटवून दिली आणि सर्व जीवांच्या प्रती दीन,गरीबी,प्रेमभाव तसेच दया प्रगट करुन दिली.कावळ्यासारखी अक्कल नष्ट करुन हंस अक्कल दिली म्हणजे माया काय आहे?काळ काय आहे? आणि सतस्वरुप काय आहे?हे समजण्याची अक्कल दिली. असे अनेक प्रकारचे अद्भूत धन देवून तिन्ही लोकांचे सर्व देवी-देवता दर्शन तसेच नमस्कार करणे चाहतात असा तिन्ही लोकात मान वाढवून दिला.याप्रकारे सतगुरुचा सतशब्द माझ्यावर अनंत अद्भूत धन देण्यासाठी गरजत राहतो म्हणजे उत्साहित राहतो. जसे जगात गरीब नवाज म्हणजे गरीबांना दु:खातून काढून सुख देणारा मनुष्य असतो तसेच सतगुरु शिष्याला काळाच्या दु:खातून मुक्त करुन सतस्वरुपाच्या महासुखात पाठविणारा शिष्य नवाज असतो असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व स्त्री,पुरुषांना सांगतात. ।।१०।।

भगत भाव भगवान ।। तत्त गुरू मांहि लखाया ।।

खंड ब्रेहेमंड का भेद ।। सोज गुरू सरणे आया ।।
मत चित समता साच ।। सरण असी बिध पाई ।।
सकळ अंग सिर पांव ।। भक्त गुरूदेव पठाई ।।
असो कर उपगार ।। सिष कूं प्रगट कीयो ।।
जन सुखिया गुरूदेव ।। राज नव खंड सिर दीयो ।।११।।

गुरुदेवाने मला केवली भक्ती दिली.तिच्याने माझ्या घटात भगवान म्हणजे सतस्वरुप तत्त प्रगट झाले आणि घटात कुद्रतीच भगवानशी मला भाव प्रगट झाला.गुरुच्या शरणात आल्याने पिंड्च खंड–ब्रम्हंड बनून गेले आणि घटातच खंड ब्रम्हंड्ला शोधल्याने घटातच सतस्वरुप भगवान प्रगट मिळून गेला.गुरुच्या शरणात आल्याने विज्ञान वैराग्य मत,विज्ञान वैराग्य चित,जगाचे सर्व जीव समान आहेत आणि परमात्म्याचे हंस आहेत ही समज तसेच भगवानच्या प्रती न तूटणारा विश्वास कुद्रतीच प्रगट होवून गेला. गुरुदेवाने केवली भक्ती देवून सर्व चौसष्टचे चौसष्ट विज्ञान वैरागी स्वभाव डोक्या–पासून पायापर्यंत म्हणजे रोम रोमात प्रगट करुन दिले.असे अनेक अद्भूत विज्ञान वैराग्य चरीत्र प्रगट करुन देण्याचे उपकार गुरुदेवाने माझ्यावर केले.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व स्त्री,पुरुषांना सांगतात की,गुरुदेवाने मला नऊ खंड म्हणजे तीन लोक चौदा भवनाच्या वरचा सतस्वरुप राज सदासाठी बक्षिसात दिले असे माझे गुरुदेव उपकारी आहेत. ।।११।।

सतगुर बड दातार ।। तांय जोडे नही कोई ।।
परसण होय गुरू देव ।। दत्त बगसे नित्त सोई ।।
धन देवे अणतोल ।। मोल सो तोल न आवे ।।
दु:ख दालद सब जाय ।। खात छेड़ो नही पावे ।।
अमर लोक साँसण दियो ।। रिध सिध दे बोहो लार ।।
जन सुखिया गुरूदेवजी ।। असा बड़ दातार ।।१२।।

सतगुरु मोठे दातार आहेत.सतगुरुच्या सारखे जोड्या मध्ये दानशील तीन लोक चौदा भवनात कोणी नाही आहे.गुरु प्रसन्न झाल्यावर सर्व प्रकारचे धन म्हणजे संसाराच्या सुखांपासून ते सतस्वरुपापर्यंतचे सुख नित्य बक्षिसात देतात.सतगुरु जे धन देतात त्या धनाचा तोलमोल तीन लोक चौदा भवनाच्या कोणत्याही वस्तूने होत नाही.गुरुने दिलेल्या धनाने दु:ख आणि दरिद्रता सर्व मिटून जाते आणि त्या धनाचा खाता–खाता आणि खर्च करता करता कधी अंत येत नाही.जसे राजा विरतेच्या बदल्यात वीर पुरुषाला जहागिरी देतो तसे सतगुरुने मला अमरलोकाची जहागिरी दिली आणि त्याच्या मागे त्रिगुणी मायेची नाश होणाऱ्या रिध्दी सिध्दीच्या पलीकडील विनाश न होणारी

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

अमरलोकाची अनेक प्रकारची रिध्दी सिध्दी बक्षिस मध्ये दिली.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व जगाला सांगतात की असे माझे गुरुदेव मोठे दानी आहेत. ।।१२।।

चमक चोक मणि लाय ।। खाल लोहा सब गाळया ।।
सोगी सोनो सोज ।। फूस नाऱ्यो पर जाळया ।।
नाड़ पकड़ गहे हात ।। दरद अपना मन लीया ।।
ओषध मूळी बाँट ।। आण रोगी मुख दीया ।।
कसर कोर गुरू सोझ ।। रोग की जड़ा कटाई ।।
जन सुखिया गुरूदेव ।। बेद पर बेदज भाई ।।१३।।

जसा लोहार मातीत पडलेल्या लोखंडाला चुंबकाने गोळा करतो आणि चामड्याच्या भात्याने आगीत गळवून शुध्द लोखंड बनवतो तसेच सोनार कचऱ्यात पडलेल्या सोन्यात सुहागी टाकून गळवतो आणि बाकी सर्व कचऱ्याला जाळून टाकतो आणि कचऱ्यातील सोन्याला चांगले सोने बनवून घेतो.याचप्रकारे गुरु मन आणि शब्द,स्पर्श, रुप,रस,गंध या विकारात लंपट झालेल्या जीवाला या विकारातून काढून खरा वैराग्य विज्ञानी संत बनवतो.जसे वैद्य रोग्याची नाडी हातात पकडून कोणती कसर कोर न ठेवता रोग्याचे दु:ख आपल्या मनात समजून घेतो व जडीबुटींची औषधी वाटून तसेच प्रमाणात मिळवून रोग्याला खायला देतात आणि रोग्याच्या रोगाला मूळापासून मिटवून देतो.याचप्रकारे गुरुदेव शिष्याचे सर्व स्वभाव,स्थिती,कर्म,धर्म,लक्षात घेवून शिष्याला ज्ञान आणि भक्तीची विधी देतात.ते शिष्याला सदासाठी आवागमनाच्या रोगापासून मुक्त करुन देतात.याकरीता गुरुदेव वैद्यांच्याही वरचे वैद्य आहेत असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व स्त्री,पुरुषांना सांगतात. ।।१३।।

इम्रत सायर सीप ।। माँय कण मोती लहिये ।।
गंगा जमना मध ।। ओर तिरथ सब कहिये ।।
धात बस्त सब होय ।। जोय सारी गेहे लावे ।।
इंद्रलोक अस्थान ।। ताय सिर बिध बणावे ।।
अेता सब अर्पण करे ।। सुर नर सुख समोय ।।
जनसुखिया गुरूदेव सूं ।। सिष ऊरण नही होय ।।१४।।

सर्व अमृत,समुद्राचे सर्व मोत्यांचे शिंपले म्हणजे सर्व मोती तसेच समुद्राचे सर्व हिरे, गंगा,यमुनाचे सर्व तिर्थांचे(सुखाचे फळ)जगातील सर्व धातूंच्या वस्तू,इंद्र लोकाचे सर्व सुख,इंद्र लोकाच्या वरचे विधी विधीचे सर्व लोकांचे सुख,जगाच्या सर्व मनुष्यांचे सुख, सर्व देवतांचे सुख गुरुदेवाला अर्पण केले तरीही शिष्यावर गुरुने केलेले सतस्वरुपाच्या सुखाने ऋण म्हणजे उपकार फिटले जात नाही असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज

जगाच्या स्त्री,पुरुषांना समजवित आहेत. ।।१४।।

बन मे चंदन रूंख ।। बांग मे गुल्ल बिराजे ।।
अष्ट धात में हेम ।। रतन मे हीरा छाजे ।।
ज्यूं गोप्याँ मे कान ।। सभापत इंदर कहीये ।।
नदियाँ मे ज्यूँ गंग ।। धाम मे पोकर लहिये ।।
सती नगर मध माँय ।। रेण तारा ससि छाजे ।।
जन सुखिया गुरू बिरम ।। सभा मे ईसा बिराजे ।।१५।।

वनामध्ये सर्व झाडांमध्ये चंदनाचे झाड,बगीच्यातील,सर्व फूलांमध्ये गुलाबाचे फूल,आठ प्रकारच्या धातूमध्ये सोने,सर्व रत्नांत हिरा,गौळणींमध्ये कृष्ण,देवतांच्या सभेमध्ये देव इंद्र,नद्यांमध्ये गंगा,चारी धामांमध्ये पुष्कर धाम,शहरातील सर्व स्त्री,पुरुषांमध्ये सती पुरुष,रात्री सर्व ताऱ्यांमध्ये चंद्र जसा शोभतो याचप्रकारे माझे बिरमदासजी गुरु जगातील सर्व स्त्री,पुरुषांमध्ये तसेच ज्ञानी,ध्यानी,दर्शनींमध्ये शोभतात असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्वांना सांगतात. ।।१५।।

गुरू दीरघ द्रगपाळ ।। मत्त सुखदेव बखाणो ।।
परथ प्राक्रम मांय ।। ध्यान ध्रु ज्यूं थिर जाणो ।।
समता शाम समान ।। पेम में पदम सरिसा ।।
दाता करण सधीर ।। ग्यान ऊजियागर ईसा ।।
गेहेरा बहोत गंभीर ।। ब्रम्ह ज्यूं थाह न आवे ।।
जनसुखिया गुरूदेव ।। तांहि गत बिर्ळा पावे ।।१६।।

माझे गुरु बिरमदासजी द्रगपाळासारखे दिर्घ आहे म्हणजे मोठे बलवान आहेत.
कथा–द्रिगपाळ म्हणजे पृथ्वीच्या खाली शेष,शेषच्या खाली कासव,त्या कासवास थांबून ठेवणारे दहा हत्ती आहेत त्यास द्रिगपाळ म्हणतात.माझे गुरुदेवजी मतात सुखदेवासारखे आहेत.माझे गुरुदेवजी पराक्रमात पृथ्वीराजा सारखे आहेत.माझे गुरुदेवजी ध्यानात धुवासारखे अटळ,समतेमध्ये विष्णूसारखे,प्रेमामध्ये पद्मसारखे आहेत.माझे गुरुदेवजी दाता आणि धैर्यामध्ये कर्णासारखे,ज्ञानामध्ये(येशुख्रिस्त किंवा महेश)यांच्यासारखे उजागर म्हणजे चतुर आहेत.सतस्वरुप ब्रम्हच्या खोलपणाचा जसा थांग येत नाही असे माझे गुरु खूप गहरे आणि गंभीर आहेत.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व स्त्री,पुरुषांना सांगतात की अशी माझ्या गुरुची निराळी गती आहे.ती गती एखादाच हंस समजू शकतो. ।।१६।।

रूषमांगज, अमरिष ।। सेन गोतम रिष जाणो ।।
बासट, संकर, सेंस ।। कपल सी सोज बखाणो ।।

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

बालमिक सी बुध ।। चित्त प्रिक्षत सो कहिये ।।
अगस्त रूम रिख जाण ।। ताहि गुरू सम्रथ लहिये ।।
बीर विक्रमा सारसा ।। पर ऊपगारी प्राण ।।
सतगरू बीरम दासजी ।। सुखिया हे तम जाण ।।१७।।

माझे गुरु बिरमदास महाराज राजा रुखमानंद व राजा अमरीषसारखे आहेत.(अमरीष राजाची कथा)छापमध्ये गौतम ऋषी सारखे आहेत.माझे गुरु वशिष्ठ मुनीसारखे आहेत. माझे गुरु शंकराचार्यासारखे ज्ञानी आहेत.माझे गुरु समज मध्ये कपीलसारखे आहेत.माझे गुरु बळामध्ये शेषनागासारखे आहेत.माझे गुरु बुध्दीत वाल्मिकसारखे आहेत.माझे गुरु चित्तात परीक्षित सारखे आहेत.माझे गुरु तीन चुळात समुद्र पिणारे अगस्त ऋषीसारखे आहेत.माझे गुरु लोमसऋषी सारखे आहेत असे माझे गुरु समज मध्ये,बुध्दीत,ज्ञानात,बळामध्ये,चित्तामध्ये सर्व अंगामध्ये समर्थ आहेत म्हणजे या सर्वांहून अधिक आहेत.माझे गुरु बिरमदासजी महाराज राजा विक्रमसारखे व राजा हातमसारखे वीर आणि पर उपकारी आहेत असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व ज्ञानी,ध्यानी,स्त्री,पुरुषांना सांगत आहेत. ।।१७।।


पाडाँ मंझ सुमेर ।। पंख मे गुरड़ कहीजे ।।
नरन मे ज्यूं भूप ।। फोज मे गेवर लीजे ।।
देही मे ज्यूँ नाक ।। देव मंझ अन्न बखाणो ।।
भोजन में पकवान ।। मेहेल मे दीपग जाणो ।।
कासब सुत जो ऊगीयाँ ।। मंड उजाळा होय ।।
यूं सभा मे सुखराम के ।। सतगुरू बीरम जोय ।।१८।।

पर्वतामध्ये सुमेर पर्वत वेगळा आहे,पक्षांमध्ये गरुड पक्षी निराळा आहे,प्रजेमध्ये राजा निराळा आहे.फौजेमध्ये हत्ती सर्व प्राण्यांपेक्षा वेगळा आहे.देहीमध्ये सर्व अंगापेक्षा नाक वेगळे आहे.भोजनामध्ये मिठाई सर्व पदार्थांपेक्षा निराळी आहे.रात्रीच्या अंधारात महालात दिवा वेगळा आणि निराळा आहे असे माझे गुरु जगामध्ये सर्व नर,नारी, ज्ञानी,ध्यानी,दर्शनी,साधू,संत,देवी देवतांहून वेगळे आणि अनोखे आहेत.जसे सूर्य उदय न झाल्या कारणाने रात्री सर्वीकडे अंधार राहतो आणि सूर्य उगवताच पूर्ण सृष्टीमध्ये प्रकाश होतो याचप्रकारे माझ्या गुरुकडून विज्ञान ज्ञान ऐकताच जगाचे स्त्री,पुरुष तसेच ज्ञान्यांचा माया मोह तसेच भ्रमाचा विनाश होतो आणि सर्वात विज्ञान ज्ञानाचा प्रकाश होतो असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्वांना आपले गुरु बिरमदासजी महाराजांच्या बाबतीत सांगत आहेत. ।।१८।।

गुरू ज्यूँ ब्रम्हसरूप ।। ताय में फेर न कोई ।।

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

सता समाधी प्राण ।। बेण ब्रम्हा सा होई ।।
सीतळ बिसन समान ।। साच पंडव सुत जाणो ।।
कळास किसन कबीर ।। ग्यान गोरख बखाणो ।।
जन सुखिया गुरूदेवजी ।। मेरे इनन समान ।।
बिरमदास गुरू ऊपरे ।। वारूँ बेद कुराण ।।१९।।




माझे गुरु सतस्वरुप म्हणजे ब्रम्हस्वरुप आहे यात काही अतंर म्हणजे कमी जास्त नाही. माझ्या गुरुचा प्राण सत्ता समाधी देशात आहे.माझ्या गुरुचे वचन सतस्वरुप ब्रम्हचे आहे.माझे गुरु विष्णूच्या सारखे शितल आहेत.

कथा–भृगु ऋषीने विष्णूच्या छातीवर लाथ मारली तरीही विष्णूने भृगुवर राग न करता भृगुचा पाय कुरवाळला आणि बोलला की तुझ्या पायाला दुखापत तर नाही झाली.खरे बोलण्यात माझे गुरु पांडव पुत्र युधिष्ठिर सारखे आहेत.माझे गुरु कलेत चौदा कलाधारी कृष्ण तसेच पूर्ण कलाधारी कबीरासारखे आहेत.माझे गुरु ज्ञानात गोरक्षनाथा सारखे आहेत.याप्रकारे माझे गुरु सर्व अंगात समर्थ आहेत.अशा माझ्या गुरुच्यावर मी आतापर्यंत प्राप्त केलेले वेद व कुराणचे सर्व ज्ञान,ध्यान,कर्मकांड,करण्या ओवाळून टाकतो आणि माझ्या गुरुची समर्थाई पाहून वेद,कुराणच्या सर्व विध्या,सर्व ज्ञान सदासाठी त्यागून देतो.।।१९।।

तारण तिरण गुरूदेव ।। भेव भव सागर दीया ।।
बिन खेवट बिन नाँव ।। बाहाँ गहे बाहेर लीया ।।
चिदानंद महाराज ।। ब्रम्ह पुरण गुरू देवा ।।
धिन्न धिन्न तुम अवतार ।। धिन्न दरसण ले भेवा ।।
बंधी छोड़ गुरूदेव ।। दया सागर गुण दाता ।।
जन सुखिया गुरूदेव ।। ब्रम्ह ज्यूँ बण्या बिधाता ।।२०।।

माझे गुरु जीवांना तारणारे आहेत.भवसागरातून तिरण्याची विधी शिकविणारे आहेत. माझे गुरु केवट आणि नावाच्या आधाराविना बाहू पकडून शिष्याला भवसागराच्या बाहेर काढतात.माझे गुरु चिदानंद महाराज आहे(चिदानंद महाराज म्हणजे तीन ब्रम्हतील चिदानंदब्रम्ह नाही तीन ब्रम्हच्या पलीकडीचे आनंदपद आहेत.माझे गुरु पूर्णब्रम्ह आहेत.जीव तारण्यासाठी आलेला असा माझ्या गुरुचा अवतार धन्य आहे, धन्य आहे.माझ्या गुरुचे जो ही जीव दर्शन घेतो तसेच भवसागरातून तिरण्याचा भेद घेतो तो जीव धन्य आहे.माझे गुरु जीवाला काळाच्या बंदी गृहातून(जेलमधून) सोडविणारे दयेचे सागर आहेत.माझ्या गुरुत सतस्वरुपाचे सर्व गुण आहेत तसेच माझे

गुरु सतस्वरुपासारखे दाता आहेत.माझे गुरु जसे सतस्वरुप ब्रम्ह विधाता आहे म्हणजे जीवाला जसे लिहून दिले तसे होते त्यात कोणाच्याने बदल होत नाही याप्रकारे विधाता आहे म्हणजे माझ्या गुरुने जीवाला लिहून दिलेला मोक्षाचा पट्टा ३लोक १४भवनात कोणी नाही बदलू शकत असे माझें गुरु सतस्वरुपासारखे विधाता आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्वांना सांगून राहिले आहेत.।।२०।।

गुरू समरथ सिष जाण ।। निरंजन आद गुसाँई ।।
पारब्रम्ह गुरूदेव ।। फेर सिर्जण सो सांई ।।
जोत सरूपी आप ।। रिजक पूरण गुरूदेवा ।।
घड भंजण क्रतार ।। अलख अबनासी सेवा ।।
जन सुखिया गरूदेवजी ।। हरसूं ईधक बताय ।।
प्राण पुर्ष से ईधक हे ।। बोलत हे घट मांय ।।२१।।

गुरुच निरंजन आहे,आदि गोस्वामी आहे,पारब्रम्ह आहे,सिरजनहार आहे,साई आहे, सतज्योत स्वरुपी आहे,रिजक पुरविणारे आहे,घडभंजन कर्तार आहे,अलख आहे, अविनाशी आहे असे शिष्यांनी गुरुला समर्थ जाणून गुरुची भक्ती केली पाहिजे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,गुरुदेवजी हे हरपेक्षा ही अधिक आहेत तसेच घटात बोलणाऱ्या प्राण पुरुषापेक्षाही अधिक आहेत असे ज्ञानाने समजले पाहिजे. ।।२१।।

गुरू सरणे गोविंद ।। मिलन की किमत आवे ।।
ईदंर मेहे बरसाय ।। जमीपर साख निपावे ।।
प्रदेशी प्रभोम ।। गेल बूजे घर आवे ।।
चले आपणे पांव ।। धिन्न सो पंथ बतावे ।।
जन सुखिया फल नीर रे ।। पीवत तर्वर मांय ।।
सम्रथ साहेब पावीया ।। सतगुर सरणे आय ।।२२।।

गुरुच्या शरणात गेल्यानेच गोविंद प्राप्तीची हिकमत माहित होते.जसे इंद्र पाण्याचा वर्षाव करुन जमीनीवर शेती पिकवतो(उपज करतो)तसे गुरु शिष्यात विज्ञान ज्ञान प्रगट करुन शिष्याला विज्ञान ज्ञानी बनवतो.परदेशी आपल्या देशाहून माहित नसलेल्या मुलूखात कोणाच्या घराचा रस्ता विचारत-विचारत जातो.तो परदेशी अनोळखी नगराच्या घरी पोहचण्यासाठी आपल्या पायाने चालत राहतो परंतु त्याला घर मिळत नाही.जेव्हा घराचा रस्ता दाखविणारा भेटतो तेव्हाच तो घरी पोहचतो तो पर्यत इकडे-तिकडे भटकून थकत राहतो.जर त्याला रस्ता दाखविणारा मिळाला नसता तर तो घरी पोहचलाच नसता,थकून कुठे बसून राहिला असता.रस्ता दाखविणाऱ्याने रस्ता

दाखविला म्हणून परभौमहून आलेला परदेशी घरी पोहचला याकरीता परदेशीसाठी घरचा रस्ता दाखविणारा धन्य आहे याच प्रकारे बिना गुरुदेवच्या भेटल्याने आणि बिना रस्ता दाखविल्याने प्राण आनंदपदाच्या घरी पोहचत नाही.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,जसे फळ झाडापासून पाणी पिऊन परिपक्व होते याचप्रकारे जीव सतगुरुच्या शरणात समर्थ साहेब मिळवतो. झाडाशिवाय फळ पाणी पिऊ शकत नाही याचप्रकारे सतगुरुविना शिष्य साहेब मिळवत नाही म्हणून गुरु शिष्यासाठी धन्य आहे.।।२२।।

तन मन अरपे धन ।। बोले मीठी मुख बाणी ।।
सतगुरू सूं आधीन ।। करे म्हेमा बोहो आणि ।।
प्रेम सो पिलंग ढुळाय ।। प्रित की सोड बिछावे ।।
चित सो चँवर कराय ।। भाव प्रसादी लावे ।।
जन सुखिया सिष साच सूं ।। अष्ट उमै अंग मांय ।।
तन मन दिल को साच ले ।। सीस निवाजे जाय ।।२३।।

याकरीता आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व शिष्यांना समजवितात कि,गुरुला तन,मन व धन अर्पण केले पाहिजे.गुरुशी गोड वाणी बोलली पाहिजे.सतगुरुशी आधीन राहिले पाहिजे.गुरुची अनेक विधीने महिमा केली पाहिजे.जसे घरी कोणी मोठा माणूस(मनुष्य) येतो तर त्याच्यासाठी पलंग टाकतात,पलंगावर गादी टाकतात.गादीवर त्यांना बसवतात आणि आनंदित करणाऱ्या हवेसाठी चंवर(पंखा)हलवतात आणि स्वादिष्ट भोजन प्रसादी बनवतात.याप्रकारे गुरुसाठी प्रेमाचा पलंग टाकला पाहिजे म्हणजे गुरुशी सदा प्रेम केले पाहिजे.प्रितीची गादी टाकली पाहिजे म्हणजे गुरुशी सदा प्रिती केली पाहिजे,चित्ताचे चंवर हलवले पाहिजे म्हणजे गुरु मध्ये सदा चित्त ठेवले पाहिजे.तसेच गुरुसाठी भावाचा भोजन प्रसाद केला पाहिजे म्हणजे गुरुचा सदा भाव ठेवला पाहिजे.या प्रकारचे सर्व स्वभाव शिष्याने गुरुसाठी ठेवले पाहिजे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व शिष्यांना समजवतात कि,याप्रकारे मोक्ष प्राप्त करण्या करिता गुरुवर विश्वास करुन तन,मन,धन अर्पण करुन गुरुच्या चरणात मस्तक नमविले पाहिजे. ।।२३।।

सतगुर द्रसण जाय ।। और मन में नही लावे ।।
गुरू देवे निज सरूप ।। रूप निरखत दिन जावे ।।
गुरू बोले सो बेण ।। चित्त हिरदे धर दिजे ।।
और सकळ बिध त्याग ।। मान गुरू बायक लिजे ।।
गुरू गोविंद जन एक हे ।। ता मे फेर न कोय ।।

साचा सिष सुखरामजी ।। ज्यां गत अेसी होय ।।२४।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की सतगुरुचे दर्शन करायला जायच्या वेळी सतगुरुला गोविंद म्हणजे हर समजले पाहीजे.गुरुला हरपेक्षा कमी समजण्याच्या गोष्टी मनात नको आणले पाहिजे.गुरुदेवचे निजरुप हे गोविंदरुपच आहे असे समजून त्याला निरखून निरखून दिवस व्यतीत केले पाहिजे.गुरुजी वाणी बोलतात ती वाणी चित्त लावून ह्दयात धारण केली पाहिजे आणि जगाच्या सर्व मायावी गोष्टी त्यागून फक्त गुरुच्या वचनावर चालले पाहिजे असा शिष्याने स्वभाव बनवला पाहिजे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,शिष्याला गुरु गोविंद तसेच गुरुच्या बरोबरीचा संत एकाच समर्थाईचा म्हणजे गोविंदच दिसला पाहिजे त्यांच्यात अंतर नको दिसले पाहिजे.ज्या शिष्याची गती गुरु गोविंद एकच मानण्याची होते तोच शिष्य खरा आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्वांना सांगतात. ।।२४।।

गुरू बेचे बिक जाय ।। हरक मन माय बधावे ।।
आ बिध गाढी मूठ ।। कदे गोता नही खावे ।।
अेकन अंग रहाय ।। मत सो मुचे न कोई ।।
दिन दिन दुणी प्रीत ।। सरण सतगुरू की सोई ।।
गुरू पत मे सुखराम जी ।। जे सिष साचा होय ।।
देवळ इंडो चढ गयो ।। पत्त प्राक्रम जोय ।।२५।।

तोच शिष्य खरा आहे जो गुरु जर विकतात तर विकला जातो आणि उलट वरुन मनात हर्षित होतो अशा शिष्याचा गुरुमध्ये पक्का विश्वास आहे हे समजते असा शिष्य कधी आवागमनच्या फेऱ्याचा गोता खात नाही अशा शिष्याचा स्वभाव गुरुच्या स्वभावाचा बनतो त्याला त्याचा स्वत:चा स्वभाव राहत नाही.अशा शिष्याचे मत गुरुचे मत राहते त्याचे गुरु मत कधी दोलायमान होत नाही उलट त्याची गुरुशी दिवसेंदिवस प्रिती वाढते.असा स्वभाव ज्याचा आहे तोच सतगुरुच्या शरणात आहे असे समजा असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की जो शिष्य याप्रकारे गुरुपतामध्ये पक्का आहे तोच खरा शिष्य आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात तोच शिष्य जसे मंदिरावर चढवलेला कळस राहतो तसे गुरुरुपी मंदिरावर चढलेल्या कळसा समान राहतो.त्या शिष्यात हा पराक्रम गुरुच गोविंद आहे हा विश्वास आल्याने आला आहे.।।२५।।

।। साखी ।।

तीन लोक माया सही ।। चौथे लोक न जाय ।।
जीवाँ कारण साईयाँ ।। बफ धाऱ्यो जुग आँय ।।१।।

३ लोक १४ भवनात मायेचेच ज्ञान आहे.काळाच्या देशात ठेवण्याचेच ज्ञान आहे. आवागमनाच्या फेऱ्यातच ठेवण्याचे ज्ञान आहे.तीन लोकाच्या पलीकडचे महासुखाच्या चौथ्या लोकात जाण्याचे ज्ञान नाही म्हणून महासुखाच्या चौथ्या लोकात घेवून जाण्या–करीता साईने शरीर धारण केले आहे आणि संसारात राहून जीवांना चौथ्या लोकाचे ज्ञान देवून चौथ्या महासुखाच्या लोकात पोहचविले आहे आणि पोहचवित आहेत. ।।१।।

**अेसो ग्यान ऊचारीयो ।। निगम बेद गम नाय ।।**
**तीनू गेला छोड कर ।। ऊपराड़े हंस जाय ।।२।।**

साईने संसारात येवून निर्गुण ज्ञान तसेच वेदाच्या ज्ञानात जी विधी नाही आहे अशी निर्गुण तसेच सगुणच्या पलीकडची वैराग्य विज्ञान ज्ञानाची विधी जीवांसाठी प्रगट केली आहे.ही विधी जो जीव धारण करतो तो जीव मृत्युलोक,स्वर्गलोक व पाताळलोकात जाणारे सर्व तिन्ही रस्त्यांना सोडून स्वर्गाच्या वरच्या रस्त्याने महासुखाच्या चौथ्या लोकात म्हणजे सतस्वरुप आनंदपदात जातो.।।२।।

**ब्रम्हा बिसन महेस हे ।। सक्त ध्रम परवाण ।।**
**जन सुखिया देखत रहे ।। हंस पहुँते निर्बाण ।।३।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,ब्रम्हा,विष्णू,महादेव,शक्ती,धर्मराज व अन्य सर्व देव मोक्षात म्हणजे चौथ्या महासुखाच्या लोकात जाणाऱ्या हंसाला पाहतच राहतात आणि तो हंस यांच्या सर्वांसमोर पाहता पाहताच काळापासून मुक्त अशा महानिर्वाण पदात पोहचतो. ।।३।।

**अेसा सतगुरू सांईयाँ ।। अदभुत ग्यान सुणाय ।।**
**बेद कतेब न पावसी ।। थिर भये वाहाँ जाय ।।४।।**

जे ज्ञान हिंदूंच्या वेदात तसेच मुसलमानांच्या कुराणात नाही आहे असे अद्भूत ज्ञान सतगुरु स्वामी संसारात येवून जीवांना सांगतात.असे सतगुरुचे ज्ञान ऐकून अनेक जीव वेदांची आणि कुराणाची पोहच नाही आहे अशा चौथ्या महासुखाच्या देशात जावून स्थिर होतात आणि तेथे अनंत सुख लुटतात. ।।४।।

**तीन लोक जावे नही ।। सुर नर धर पाताळ ।।**
**हंस पहूँच्या गिगन मे ।। पाप पुन्न नही काळ ।।५।।**

अशा सतगुरुचे ज्ञान प्राप्त केलेले हंस तीन लोक म्हणजे स्वर्गलोक,मृत्युलोक,तसेच पाताळ लोकात न जाता गगनात चौथा लोक म्हणजे सतस्वरुप आनंदपदाच्या लोकात पोहचतात.तेथे त्रिगुणी माया नाही आहे याकरीता तेथे शुभ म्हणजे पुण्य आणि अशुभ म्हणजे पाप कर्म राहत नाही.या कारणाने तेथे मायेचे सुख किंवा काळाचे दु:ख राहत

नाही.तो लोक विज्ञान ज्ञान स्वरुपाचा आहे.तेथे विज्ञान ज्ञानाचे अद्भूत अनंत तृप्त सुख राहतात.ते सुख हंस तेथे घेतो.।।५।।

**तीन ताप कूं मेट कर ।। सबका अमल उडाय ।।**
**जन सुखिया गुरूदेवजी ।। ब्रम्ह के मांही मिलाय ।।६।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,गुरुदेवजी हंसाचे आधी म्हणजे मनाचे दुःख,व्याधी म्हणजे तनाचे दुःख,उपाधी म्हणजे हंसाचा काही संबंध नाही अशा प्रालब्धाच्या पलीकडीचे येवून येवून पडणारे दुःख मिटवून देतात म्हणजे आधी,व्याधी, उपाधी तिघांचा अधिकार सदासाठी मिटवून देतात आणि गुरुदेवजी हंसाला महासुखाच्या सतस्वरुप ब्रम्हमध्ये सदासाठी मिळवून देतात. ।।६।। ।। इति गुरू महिमा संपूरण ।।